# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in


## अधिसूचना (प्रारुप)

## विद्युत अधिनियम, २००३

**क्र. मविनिआ/लिगल/२०१७/----** : विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम ८६(१)(इ) आणि १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन व पूर्व-प्रसिध्दीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) विनियम, २०१५" मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :-

### १. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ

१.१ या विनियमांना, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७", असे म्हणावे.

१.२ हे विनियम संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू राहतील.

१.३ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

### २. मुख्य विनियमांच्या विनियम २.१ मधील व्याख्यांमध्ये सुधारणा

**२.१** मुख्य विनियमांच्या विनियम २.१ मध्ये खालील व्याख्यांची भर घालण्यात येईलः

"(एनए) "नूतनशील ऊर्जा" म्हणजे नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून, ज्यामध्ये त्यांचे एकत्रित संयोग समाविष्ट असतील, ग्रिडमध्ये सामावण्याजोग्या दर्जाची निर्माण झालेली वीज;"

"(पीए) "नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा" म्हणजे ग्राहकाच्या जागेत बसविलेली नूतनशील ऊर्जा विद्युत यंत्रणा जी अशा ग्राहक किंवा त्रयस्थ व्यक्ती/संस्थेच्या मालकीची असेल आणि/किंवा त्यांच्याकडून चालविण्यात येत असेल, जेथे नूतनशील ऊर्जेचे रूपांतर विजेत करण्यात येते;"

२.२ मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (ओ) मधील 'छपरावरील सौर पीव्ही यंत्रणा" ही व्याख्या काढून टाकण्यात येईल आणि त्याऐवजी खालील व्याख्या समाविष्ट करण्यात येईल :

"(ओ) "नूतनशील ऊर्जा स्त्रोत" म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५ मध्ये व्याख्या केलेले मिनि, मायक्रो आणि लघु हायड्रो, पवन, सौर, ऊसाच्या चिपाड्यासह बायोमास, बायो-इंधन, शहरी किंवा

महानगरपालिका क्षेत्रातील घन कचरा यासारखे नूतनशील ऊर्जा स्त्रोत किंवा अशा स्त्रोतांचा एकत्रित संयोग आणि भारत सरकारच्या नवीन आणि नूतनशील ऊर्जा मंत्रालयाने मान्यता किंवा मंजुरी दिलेले अन्य स्त्रोत;"

**३. मुख्य विनियमांमधील संज्ञांत बदल**

मुख्य विनियम आणि त्यांच्या परिशिष्टांमध्ये ज्या ज्या ठिकाणी खालील संज्ञा असतील त्या खाली दिलेल्या संज्ञांनी बदलण्यात येतीलः

(ए) 'सौर पीव्ही निर्मिती यंत्रणा' आणि 'सौर पीव्ही यंत्रणा' ही संज्ञा 'नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा' या संज्ञेने बदलण्यात येतील;

(बी) 'सौर निर्मिती मीटर' ही संज्ञा 'नूतनशील ऊर्जा निर्मिती मीटर' या संज्ञेने बदलण्यात येईल;

(सी) 'सौर नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन' आणि 'सौर आरपीओ' ही संज्ञा 'नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन' या संज्ञेने बदलण्यात येतील;

(डी) 'सौर ऊर्जा' ही संज्ञा 'नूतनशील ऊर्जा' या संज्ञेने बदलण्यात येईल.

**अश्वनी कुमार सिन्हा**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई,**
**--------, २०१७**

---

सूचनाः "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) विनियम, २०१५", शासकीय राजपत्रात दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.